# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०२६

## (सकाळी १०-०० ते ११-३० वाजता)

**अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (विशेष बैठक)**

**(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना)** [**अनुक्रमांक** (१)]

(१) **सर्वश्री विक्रम काळे, अमोल मिटकरी, शिवाजीराव गर्जे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"**राज्यातील शाळांना सन २०२४-२५ या वर्षाची पटसंख्या ग्राह्य धरून अनुदान मिळणेबाबत**" या विषयावरील **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक ५३२३ ला दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना)** [**अनुक्रमांक** (२) **व** (३)]

(२) **सर्वश्री सत्यजीत तांबे, विक्रम काळे, किशोर दराडे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्याच्या कृषी व सिंचन व्यवस्थेचा आरसा असलेला 'आर्थिक पाहणी अहवाल' गेल्या १४ वर्षांपासून अपूर्ण माहितीच्या आधारे प्रसिद्ध होत आहे, ही बाब राज्याच्या प्रगतीसाठी अत्यंत भूषणावह नाही. सिंचनाखालील क्षेत्राची अद्ययावत आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे राज्याचा नेमका सिंचन अनुशेष किती आहे आणि तो दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे कठीण झाले असणे, या प्रकरणात जिल्हाधिकारी कार्यालय आणि कृषी आयुक्तालयातील संबंधित शासकीय अधिकारी व यंत्रणेने माहिती संकलनाबाबत कमालीचा निष्काळजीपणा व दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे दिसून येत असणे, कारण अनेक जिल्ह्यांची माहितीच प्राप्त झालेली नसणे, अद्ययावत माहितीअभावी सिंचन प्रकल्पांसाठी नियोजित केलेल्या शासकीय निधीचा विनियोग करताना तांत्रिक पेच निर्माण होत असून, यामुळे शेतकरी व समाजावर विपरीत परिणाम होत असणे, तरी शासनाने सदर माहिती तातडीने संकलित करून अहवालात समाविष्ट करावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री विक्रम काळे, अमोल मिटकरी, शिवाजीराव गर्जे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"बीड जिल्ह्यासह लगतच्या जिल्ह्यांसाठी आरोग्यदायी ठरणाऱ्या अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात विविध योजना राबविण्यात आलेल्या नसणे, शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करुन अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टीची सोय उपलब्ध करुन दिलेली असणे, मात्र तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि कुशल तंत्रज्ञ उपलब्ध नसल्याने सदर यंत्रणेचा वापर होत नसणे, तसेच येथे कार्डिओलॉजिस्टची (हृदयविकार तज्ज्ञ) नियुक्तीही कायमस्वरुपी झालेली नसून सद्य:स्थितीत केवळ एका वैद्यकीय अधिकाऱ्याची वरिष्ठ निवासी वैद्यकीय अधिकारी पदावर तात्पुरती नियुक्ती करण्यात आली असून त्यांनाही केवळ चार महिन्यांच्या आदेशावर काम करावे लागत असणे, परिणामी ग्रामीण भागातील गरीब रुग्णांची मोठी गैरसोय होत असून अंबाजोगाई आणि परिसरातील सर्वसामान्य व गरीब रुग्णांसाठी "स्वाराती रुग्णालय" हा मोठा आधार असणे, मात्र हृदयविकाराचा झटका आल्यास किंवा तातडीच्या हृदयशस्त्रक्रियेची गरज भासल्यास येथे उपचार मिळत नसल्याने रुग्णांना लातूर किंवा सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्याने रुग्णांना मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

**(गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक (४) व (५)]**

(४) **सर्वश्री सतेज उर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"सावंतवाडी, दोडामार्ग, वेंगुर्ले तालुक्यामध्ये (जि.सिंधुदूर्ग) डेव्हलपमेंट झोन येणार असल्याने शासन जमिनी संपादीत करणार असल्याचे सांगुन स्थानिक शेतकरी व बागायतदारांकडून त्यांच्या मोक्याच्या जमिनी नाममात्र दराने विकत घेतल्या जात असल्याचे प्रकार वाढत असून यामध्ये येथील काही मध्यस्थ व परप्रांतीय गुंतवणूकदार सक्रीय झाले असणे, यामुळे येथील स्थानिक शेतकरी व बागायतदार भूमिहीन होत असल्याने गाव सोडून जात असणे, याबाबत शासनाने तातडीने माहिती घेवून येथील मध्यस्थ व परप्रांतीय गुंतवणूकदार तसेच त्यांच्याशी संगनमत करणारे संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचारी

यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज असणे व स्थानिक शेतकऱ्यांना भूमिहीन होण्यापासून रोखण्याची आवश्यकता असणे याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, सतिश चव्हाण वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"राज्यातील वातावरणातील हवामान बदलांमुळे तसेच पाऊसाच्या अनियमिततेमुळे शेतीवर विपरित परिणाम होत असल्याने पिकांच्या उत्पादकतेमध्ये घट होऊन उत्पादनांचा दर्जादेखील खालावत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असणे, राज्यात मागील काही वर्षांत अतिवृष्टी तसेच पुरांमुळे लाखो हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झालेले असणे, त्याचप्रमाणे शेतजमीन, विहीर, शेततळी आणि पशुधनाच्या नुकसानीसह जिवित व वित्तहानी झालेली असणे, हवामानातील बदलामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असणे, जागतिक तापमान वाढीच्या परिणामाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना सोसावा लागत असल्याने या संपूर्ण बाबींचा विचार करतां नैसर्गिक संकटांवर मात करीत असतांना अन्य उपायांसोबत कृषी संशोधनाची दिशा बदलण्याची गरज असणे याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**(बुधवार, दिनांक ४ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक (६) व (७)]**

(६) **सर्वश्री संजय खोडके, विक्रम काळे, अमोल मिटकरी, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"राज्य शासनाकडून शेतकऱ्यांकडील सोयाबीन हमीभावाने (MSP) खरेदी करण्यासाठी आखण्यात आलेले धोरण अंमलात आणताना विविध प्रशासकीय व कार्यात्मक अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत असणे, विशेषतः सोयाबीनचे उत्पादन बाजारात येण्याच्या कालावधीत तात्काळ खरेदी सुरू करणे आवश्यक असताना अनेक ठिकाणी MSP खरेदी केंद्रे वेळेवर सुरू न होता उशिरा सुरू केली असणे, परिणामी, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची वेळेवर विक्री करता येत नसणे, गरजेनुसार खरेदी केंद्रांची संख्या निश्चित न करणे, खरेदी कालावधीबाबत स्पष्ट व पूर्वनियोजित वेळापत्रक जाहीर न करणे, तसेच प्रशासनाकडील परवानगी प्रक्रिया, मंजुरीतील विलंब आणि धोरणात्मक अनिश्चितता यांमुळे खरेदी केंद्रे वेळेवर सुरू करण्यात अडथळे येत असणे, काही केंद्रांवर सोयाबीनच्या आर्द्रता टक्केवारी व गुणवत्ता (FAQ Standard) संदर्भातील निकषांमुळेही खरेदी प्रक्रियेत अडचणी निर्माण होत

असणे, तसेच काही प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांकडे सोयाबीन शिल्लक असतानादेखील खरेदी केंद्रे अकाली बंद करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभावाने विक्रीची संधी मिळत नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी दराने खुल्या बाजारात विक्री करावी लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच मान्यता प्राप्त खाजगी अंशतः अनुदानित, विनाअनुदानित व १०० टक्के अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त होऊन नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना (OPS) लागू करावी, याबाबत विविध शिक्षक संघटना शासनाकडे वारंवार निवेदने सादर करीत असून याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय यांनी निर्देश दिलेले असूनही शासनाने अद्याप अंतिम निर्णय जाहीर केलेला नसणे, शासकीय, निमशासकीय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षक दिनांक १४ मार्च ते २० मार्च, २०२३ या कालावधीत बेमुदत संप पुकारलेला असणे, त्यानंतर माजी मुख्य सचिव श्री.सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्त करुन उक्त समितीस दिनांक १४ जून, २०२३ पर्यंत तीन महिन्यांची मुदत देण्यात आली असणे, याच अनुषंगाने जुनी पेन्शन समन्वय संघाच्या नेतृत्वाखाली दिनांक ३ मे, २०२३ पासून आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलन सुरू असून दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अनुदानित, विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित शैक्षणिक संस्था, वस्ती शाळा तसेच इतर विभागांमध्ये जनसेवक म्हणून नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक असणे, तसेच, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या अनेक शिक्षकांची जीपीएफ खाती सुरू असली तरी त्यामध्ये हप्त्यांची कपात सध्या होत नसणे, सन २००५ नंतर शासनाने शासकीय, निमशासकीय सेवा तसेच नगरपालिका, महानगरपालिका व इतर अनुदानित शाळांमधील सुमारे १६,१०,००० शासकीय कर्मचारी व सुमारे ७,००,००० मान्यताप्राप्त शिक्षक/कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करता नवीन निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू केलेली असणे, डीसीपीएसमधील (DCPS) जमा रक्कम अद्याप एनपीएसमध्ये वर्ग झालेली नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना अचूक आर्थिक तपशील उपलब्ध होत नसणे, काही कर्मचाऱ्यांची एनपीएस खाती अद्याप सुरू झालेली नसल्याची बाब निदर्शनास येणे,

नगरपालिका व महानगरपालिका शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहावा व सातवा वेतन आयोगाचे हप्ते प्रलंबित असल्याच्या तक्रारी असणे, विभागाच्या शासन निर्णयानुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर राज्यातील जिल्हा परिषद तसेच मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयांतील १००% अनुदानित पदावरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, जे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS/NPS) सदस्य आहेत, त्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबास कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यू उपदान तसेच रुग्णतेमुळे सेवानिवृत्त झाल्यास रुग्णता निवृत्तीवेतन व सेवानिवृत्ती उपदान देण्याबाबत Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 मधील तरतुदीनुसार कुटुंब निवृत्तीवेतन व रुग्णता निवृत्तीवेतन लागू करण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन असणे, उक्त प्रकरणी शासनाने सविस्तर चौकशी करुन समितीच्या अहवालातील शिफारशींनुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी व त्यानंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **मुख्यमंत्री** :

(क) "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२०२६" हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "वस्तू व सेवा कर संस्था (GSTN) यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री** : "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक लेखा" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **अन्न व औषध प्रशासन मंत्री** : "हाफकिन जीव - औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

(१) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

महावितरणने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेवर लादलेल्या जाचक मर्यादा, वीज नियामक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन आणि सौर ऊर्जा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाबाबत.

(२) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने ५० हजार पदे व शासकीय विभागाच्या वतीने २० हजार पदे भरण्याबाबत.

(३) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १० वर आपत्ती व्यवस्थापन मंत्री निवेदन करतील :-**

शहानूर नदीच्या काठावरील मौजे विहिगांव, जि.अमरावती येथील घरांना पुराच्या व भूस्खलनाच्या धोक्यापासून संरक्षण देणेबाबत.

(४) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

देहु जवळील संत तुकोबाची साधनाभूमी श्रीक्षेत्र भंडारा, घोराडा आणि भामचंद्र डोंगर भूमाफिया, विकासक व एमआयडीसीच्या अतिक्रमणातून सोडविण्याकरीता वारकरी व शेतकऱ्यांचे आझाद मैदान (मुंबई) येथे सुरु असलेले आंदोलन.

(५) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर मराठी भाषा मंत्री निवेदन करतील :-**

केंद्र सरकारने मराठी भाषेला दिलेला “अभिजात दर्जा” कागदावर असल्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(१) **श्री.अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील मुख्य अग्निशामक अधिकारी हे पद दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ पासून रिक्त असणे, सदरचे पद भरण्यात आले नसल्याने त्यांचा अतिरिक्त कार्यभार सब फायर ऑफिसर यांच्याकडे देण्यात आला असणे, पिंपरी-चिंचवड मधील सामान्य कुटुंबातील बांधकाम व्यवसायिकांची प्रोव्हिजनल फायर एन.ओ.सी./फायनल फायर एन.ओ.सी. यासारख्या आर्थिक बाबींकरिता पिळवणूक होत असल्याचे निदर्शनास येणे, २ ते ३ महिने प्रोव्हिजनल फायर एन.ओ.सी. करीता कार्यालयाच्या फेऱ्या मारण्यास भाग पाडणे, सदर रिक्त पद वॉक-इन इंटरव्यू (Walk-in Interview) पद्धतीने त्वरित भरण्याची नितांत आवश्यकता असणे, मुख्य अग्निशामक अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेल्या अधिकाऱ्याच्या मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्यात येऊन चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना निलंबित करण्यात यावे, विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरामध्ये दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ ते आजपर्यंत देण्यांत आलेल्या एनओसीबाबत संपूर्ण चौकशी करुन या प्रकरणात संबंधित असलेल्या सर्व अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२)** **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"अकोला महानगरपालिकेमध्ये मालमत्ता सर्वेक्षणच्या नावाखाली सुरु असलेल्या दादागिरीने महानगरपालिकेने बेकायदेशीररित्या कंत्राटे देण्यात आली असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, महानगरपालिकेने दिलेली सदरची कंत्राटे व त्यांच्यामार्फत नेमलेल्या संबंधित कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांनी, नागरिकांच्या घरात घुसून महिलांना धमकावणे, फोटो काढणे आणि मानसिक छळ करण्यात येत असल्याचे त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, त्याप्रकरणी तेथील सामाजिक कार्यकर्ते यांनी विभागीय आयुक्त, नगरविकास विभाग,मंत्रालय आणि पोलिस विभागाकडे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास तक्रार केलेली असणे, सदर तक्रारीमध्ये कंत्राटदारामागील राजकीय सूत्रधार आणि त्याच बरोबर दोषी अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला असणे, परिणामी, सामाजिक कार्यकर्ते तसेच जनतेकडून देण्यात आलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **श्री.धीरज लिंगाडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शैक्षणिक संस्थेला दरवर्षी अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे लागत असणे, प्रत्येक कोर्सच्या परवानगी करीता

आवश्यक असलेल्या कागदपत्रांसोबत अग्निशमन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणे, प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या इमारतीमध्ये अग्निशमन दलाच्या नियमाप्रमाणे सदर संस्थेला पाईपलाईन करणे, पाण्याची टाकी उभारणे त्यावरील पंप तसेच अग्निशमन दलाच्या गाडीकरता पॉईंट करणे, या सर्व सुविधा स्वखर्चाने कराव्या लागत असून हे सर्व करण्याकरिता लाखो रुपयांचा खर्च येत असणे, ते केल्यानंतर ना-हरकत प्रमाणपत्र घेत असताना सदर बिल्डिंगच्या चटई क्षेत्रानुसार प्रति चौ.मी. प्रमाणे आरसीसी विखुरलेले व अर्ध पक्के अशा शासनाने ठरविलेल्या दरानुसार सेवा फी आकारली जात असणे, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनायाच्या दिनांक १ एप्रिल, २०२५ च्या परिपत्रकानुसार सेवा फी भरावी लागणे, सदरची फी ही लाखो रुपयांमध्ये असल्याने व ना-हरकत प्रमाणपत्र घेतेवेळी वेगळे चार्जेस भरावे लागत असल्याने शैक्षणिक संस्थांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून यामधून शैक्षणिक संस्थांना इतर व्यवसायिक आस्थापनेप्रमाणे गृहीत न धरता शैक्षणिक संस्थेच्या इमारतींना सूट देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण)** लक्ष वेधतील :-

"मुंबईसह उपनगरातील म्हाडाच्या इमारतींना थकीत देयके सेवाशुल्क व्याजासहीत भरण्याबाबत नोटीसा पाठविण्यात आलेल्या असणे, शहरात म्हाडाच्या एकूण ५६ इमारती ह्या ६० वर्षापूर्वीच्या इमारती असणे, त्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून सदर इमारतींकरिता पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत असणे, असे असताना म्हाडाकडून सुधारीत दराने सेवाशुल्क भरणेबाबत कळविण्यात येणे, सदर इमारती ह्या पुनर्विकासाच्या मार्गावर असताना थकीत सेवाशुल्क व सुधारीत सेवाशुल्क पाठविण्यात येणे, याबाबत विकासकाकडून देखील सेवाशुल्क भरण्याची जबाबदारी घेण्यात न येणे, सदर इमारतीमध्ये राहणारे सदनिकाधारक हे अत्यल्प उत्पन्न, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गटातील असून त्यांची आर्थिक स्थिती पाहता सदर सेवाशुल्क त्यांच्याकडून भरणे शक्य नसणे, सदर रक्कम पाहता अत्यल्प /अल्प गटातील सदनिकाधारकांमध्ये प्रचंड चिंतेचे वातावरण निर्माण होणे, अचानक एवढी मोठी रक्कम थकीत दाखविल्यामुळे सदनिकाधारकांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने फेरविचार करुन त्याच्यावर लादण्यात आलेले सेवाशुल्क संपूर्णत: व्याजासहीत माफ करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.किशोर दराडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जळगाव जिल्ह्यात कार्यरत असलेल्या कृषी विज्ञान केंद्रातील कार्यक्रम समन्वयक यांनी आपल्या पदाचा दूरूपयोग करून कृषी विज्ञान केंद्रातील ५५ एकरातील वृक्ष तोड करून परस्पर विक्री केलेली असणे, कार्यालयीन कामकाजासाठी लागणारी सामुग्री ही नाशिक येथील Destiney Planner या दुकानातून खरेदी केलेली असणे, सदर दुकान हे भावाच्या नावाने असणे, सदर दुकानातून MASK, IPAD, STATIONARY व इतर वस्तू बनावट खरेदी करण्यात आलेली दाखवणे, कोरे बिले आणून स्वतःच्या हस्ताक्षरात बनावट बिले तयार करून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेणे, तसेच कृषी विज्ञानकेंद्रात लागणाऱ्या नाशवंत खते, गादी, RO खरेदी, त्यांचे मूळगाव, मौजे पिंप्री, ता.धरणगाव येथील पुरवठा धारक दाखवुन खरेदी करणे, SEED HUB योजने अंतर्गत त्यांच्या वडीलांची निवड करून लाभ घेणे व पात्र शेतकरी यांच्यावर अन्याय करणे, कृषी विज्ञान केंद्रातील २ ट्रॅक्टर स्वत:च्या मालकीच्या मौजे पिंप्री येथील शेतीत वापरणे त्याची नोंद  LOCK BOOK मध्ये असणे, कृषी विज्ञान केंद्रातील चारा, भुसा परस्पर विक्री करून विद्यापीठाचे नुकसान करून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेणे, त्यांच्या विरुध्द दिनांक २३ मे, २०२३ रोजी चौकशीचे आदेश झालेले असतानाही चौकशी होत नसणे, त्यामुळे सदर गैरव्यवहारात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याची शक्यता नाकारता न येणे, त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये संतापाची लाट निर्माण होणे, सदर अधिकाऱ्याचे तातडीने निलंबन करून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील साखर कारखान्यांमध्ये सर्रास काटामारी व रिकव्हरी चोरी करून ऊस उत्पादक शेतक-यांची फसवणूक होणे, चालू गळीत हंगामात तर सरासरी एकूण गाळप झालेल्या ऊसाच्या १० ते १५ टक्के वजनात घट आलेली असणे, काटामारी बरोबर रिकव्हरी चोरी करण्याचे प्रमाणही वाढल्याने ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूकदार व ऊस तोडणी मजूर दुहेरी संकटात सापडणे, यामुळे राज्यातील सर्व साखर कारखान्याच्या बाहेर राज्य सरकारने संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, साखर सहसंचालक यांच्या नियंत्रणात वजनकाटा उभारण्याची मागणी असणे, स्वतंत्र वजनकाटे बसविले जाऊन ते डिजीटल व ऑनलाईन प्रणालीने शासनाच्या मुख्य सर्व्हरला जोडणे, साखर नियंत्रण आदेश १९६६ नुसार दोन साखर कारखान्यामधील २५ किलोमीटर हवाई अंतराची अट रद्द करणे, FRP चे तुकडे करणारा शासन निर्णय रद्द करून एकरकमी एफआरपी देणारा निर्णय घेणे, साखर कारखाने उसाचा सिरप, मळीपासून इथेनॉल तयार करत असल्याने साखर उताऱ्यात घट होणे, त्याचा परिणाम ऊस दरावर होऊन त्याचा थेट फटका लाखो शेतकऱ्यांना बसणे, त्याचप्रमाणे साखर कारखान्यावर

ऊस थकीत देयकांमुळे RCC कार्यवाही तात्काळ होणे, सन २०१६-१७ च्या ऊस गाळप हंगामामध्ये राज्यातील १९ साखर कारखान्यांचा FRP पेक्षा RSF ऊस दर अधिक निघणे, परंतु त्या साखर कारखान्यांनी RSF नुसार शेतकऱ्यांना ऊस देयके दिलेले नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा : शासकीय विधेयक —**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**सात : श्री. सतेज पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील नगरपालिका, महानगरपालिकेचा कारभार प्रशासनामार्फत गेले अनेक वर्ष चालविल्यामुळे वाढलेला गैरव्यवहार व नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विशेषत: मुंबई महानगरपालिकेत ८१ हजार ४४९ कोटी ३२ लाख रूपयांच्या ठेवी मोडून त्यापैकी ३६ हजार ६२३ कोटी रुपये विविध प्रकल्पांसाठी वापरण्यांचे निश्चित केल्याने त्यामध्ये झालेली अनियमितता, मुंबईची सर्वसामान्यांची लाईफलाईन असलेली बेस्ट बंद करण्याचा डाव असणे, विविध मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार, एमएमआरडीए तसेच सिडको या प्राधिकरणांमध्ये वाढलेला गैरव्यवहार, त्यामुळे त्यांची ढासळलेली आर्थिक स्थिती, विविध शहरांचे विकास आराखडे व हद्दवाढीचे प्रस्ताव रखडणे, मिठी नदी स्वच्छता व गाळ काढणे या निविदेत झालेली अनियमितता, तसेच नागपूर महानगरपालिकेत कंपोस्ट डेपो, रिंग रेल्वे, डम्पिंग यार्ड, इत्यादी कामात झालेली अनियमितता, एसटीपी प्रकल्प नसल्याने पाणी निचऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, मोठया

प्रमाणात उड्डाण पूल तयार होऊनही वाहतूक कोंडी निर्माण होणे, तसेच निधी अभावी दुरुस्तीची कामे रखडलेली असणे, गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी न होणे, एसआरए अंतर्गत झालेला भ्रष्टाचार, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीचे धोरण निश्चित करणे, म्हाडाच्या लॉटरीमध्ये झालेला गैरव्यवहार, गिरणी माथाडी व सफाई कामगार व पोलीस कर्मचारी यांना हक्काची घरे प्राप्त न होणे, केंद्र सरकारच्या जमिनीवरील झोपडपट्टी व इमारतीबाबत धोरण ठरविणे, सार्वजनिक बांधकाम अंतर्गत राज्य महामार्ग व इतर रस्त्यांची तसेच अन्य कामे निधी अभावी रखडली असून ठेकेदारांना पुरेसा व वेळेवर निधी मिळत नसल्याने रस्त्याचा दर्जा निकृष्ट असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

**आठ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **सर्वश्री श्री. सुनिल शिंदे, ॲड. अनिल परब, जगन्नाथ अभ्यंकर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"वातावरणातील बदल आणि तापमान वाढीमुळे मुंबई शहरासह कोकण किनारपट्टीचा परिसर पाण्याखाली जाणे, तसेच राज्यात दुष्काळ व अतिवृष्टीची तीव्रता वाढण्याबाबत पर्यावरण विभागाने वर्तविलेली भिती लक्षात घेता राज्य मंत्रिमंडळाने दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली "राज्य वातावरणीय बदल परिषद" दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे गठीत करण्यात आलेली असणे, "मुंबई फर्स्ट" या संस्थेने मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी पाठविलेल्या पत्रात वातावरणीय बदलांमुळे निर्माण होणा-या संभाव्य समस्यांचा सामना करण्यासाठी ठोस आराखडयाची गरज असून त्यासाठी काही उपाययोजना सुचविल्या असणे, तद्नुसार शासनाने ठोस निर्णय घेवून त्यांची अंमलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता असणे, संयुक्त राष्ट्राच्या इंटर गव्हर्नमेंट पॅनल ऑन क्लायमेट चेंज (IPCC) ने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालात कार्बन डायऑक्साईड व इतर हरितगृह वायूंच्या अमर्याद उत्सर्जनामुळे २१ व्या शतकात तापमानात १.५० सें ते २० सें ने वाढ होण्याची शक्यता वर्तविली असणे त्यामुळे समुद्र पृष्ठभागाच्या तापमानातही वाढ होऊन जागतिक पर्जन्य चक्रावरही परिणाम होणार असल्याचे सूचित केलेले असणे, मागील काही वर्षात मुंबईसह राज्यात अनेकदा आलेल्या नैसर्गिक आपत्तींचा विचार करता भविष्यात त्या टाळण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या इंटर गव्हर्नमेंट पॅनल ऑन क्लायमेट चेंज (IPCC) ने सादर केलेल्या अहवालानुसार शासनाकडून करण्यात येणारी कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, अरुण लाड वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"खेड (ता.जि.सातारा) येथील ग्रामपंचायतीमधील सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी रुपये १६,६९,१४३/- ची अनियमितता व अपहार केल्याप्रकरणीचा चौकशी अहवाल चौकशी अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांनी दिनांक ६ मे, २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना सादर केलेला असणे, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सातारा यांनी दिनांक २७ जून, २०२५ रोजी फेर चौकशी समिती नेमलेली असणे, सदर चौकशी समितीने दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी अहवाल सादर करुन त्यामध्ये ग्रामनिधीतील विकासकामांमध्ये रुपये ६,३६,५००/- ची आर्थिक अनियमितता व रुपये १०,४०६४३/- चा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले असणे, त्यानुषंगाने ग्रामविकास अधिकारी यांना सेवेतून निलंबित केले असणे व तत्कालीन शाखा अभियंता यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित असून विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचेकडे दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजी फेर अहवाल सादर करण्यात येऊन महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९ (१) नुसार सरपंच यांना अपात्र करणेबाबतची शिफारस करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, या प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ४ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.